




सायं.दैनिक **बीड**

# प्रारंभ

Email-prarambh2023@gmail.com

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे








बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक १०६ शनिवार दि. १४ जून २०२५ RNI MAHMAR/2021/81481 किंमत ३ रुपये ■पाने-४


# ...तर गांधी जयंतीला भगतसिंहगिरी करु!

## बच्चू कडूंचा सरकारला अल्टिमेटम; अन्नत्याग आंदोलन स्थगित



**प्रारंभ । वृत्तसेवा**

**अमरावती: प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी गेल्या सात दिवसांपासून सुरु असलेलं आंदोलन स्थगित केलं आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी बच्चू कडू यांचं उपोषण सुरु होतं. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी त्यांची भेट घेत सरकारची बाजू मांडली. यानंतर कडू यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. २ ऑक्टोबरपर्यंत सरकारनं कर्जमाफीची तारीख सांगावी. अन्यथा गांधी जयंतीला भगतसिंगगिरी करु, मंत्रालयात घुसू, असा थेट इशारा कडू यांनी दिला. कडू यांचं आंदोलन अमरावतीत सुरु होतं.**

पेरणीचे दिवस आहेत. डोक्यावर पाऊस आहे. त्यासोबत कार्यकर्त्यांच्या भावनादेखील महत्त्वाच्या आहेत. तुम्ही अन्नत्याग आंदोलन सोडा. अन्यथा आम्ही आत्महत्या करु, अशा आशयाचं २०० ते ३०० मेसेज मला आलेले आहेत. काल प्रहारचा एक कार्यकर्ता जीव देण्यासाठी पाण्याच्या टाकीवर चढला होता. कार्यकर्त्यांच्या भावना आणि डोक्यावर असलेला पाऊस पाहता अन्नत्याग आंदोलन तूर्तास मागे घेत असल्याची घोषणा कडू यांनी केला. मंत्री उदय सामंत आणि एका विधवा महिलेच्या हातून पाणी पित बच्चू कडू यांनी आंदोलन सोडलं. पण यावेळी त्यांनी सरकारला २ ऑक्टोबरचा अल्टिमेटम दिला.

उपमुख्यमंत्री अजित पवार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल काहीच बोलत नव्हते. त्यांनी तर हातच झटकले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कर्जमाफीवर बोलत नव्हते. पण या सगळ्यांना आपण कर्जमाफीवर बोलायला भाग पाडलं. हा आपल्या आंदोलनाचा विजय असल्याचं म्हणत कडू यांनी उपस्थितांचे आभार मानले. अन्नत्याग आंदोलन मागे घेतलेलं नाही. तर ते केवळ स्थगित केलेलं आहे. आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर उदय सामंतजी तुमच्या घराबाहेर आंदोलन करु, असा इशारा कडू यांनी दिला.

आंदोलन स्थगित करत असताना कडू यांनी दोन प्रमुख गोष्टींचा उल्लेख केला. शेतकऱ्यांकडून होणारी कर्जाची सक्तीची वसुली ८ दिवसांत थांबवा. जर कोणी गावात वसुलीसाठी आला, तर त्याला झाडाला बांधा. कर्ज वसुली करायचीच असेल तर अदानी, अंबानींकडून करा. पेरणीची हंगाम आलेला आहे. शेतकऱ्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. त्यामुळे थकित कर्जदारांना नव्यानं कर्ज द्या. हा विषयदेखील ८ दिवसांत मार्गी लावा, अशी मागणी कडू यांनी केली.



बीड ज्येष्ठ महिन्यातील संकष्टी चतुर्थी निमित्त शनिवारी बीड तालुक्यातील श्री क्षेत्र नामलगाव येथे श्री आशापुरक गणेशाचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासून भाविकांच्या मंदिरात रांगा लागल्या होत्या सकाळी श्री गणेशाची विधिवत पूजा अर्चना संपन्न झाली. (छाया कृष्णा शिंदे)

## निट युजी परीक्षेत महाराष्ट्रातून कृषांग जोशी पहिला




मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रीय चाचणी संस्थेने आज शनिवारी २०२५ चा निकाल जाहीर केला. राजस्थानमधील हनुमानगड येथील महेश केसवानीने अव्वल स्थान पटकावले आहे. त्याला ७२० पैकी ६८६ गुण मिळाले आहेत. महाराष्ट्रातून कृषांग जोशीने प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. आरव अग्रवाल सुद्धा पहिल्या दहामध्ये स्थान मिळवण्यात यशस्वी झाला आहे. इंदोरमधील उत्कर्ष अवधिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या १० मध्ये राजस्थानमधील ४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यापैकी ३ विद्यार्थी कोटाचे आहेत.

देशभरात १.२ लाख एमबीबीएस जागा

भारतात एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी एकूण ११८१९० जागा आहेत. २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात, यापैकी ११५२५० जागा भरल्या गेल्या. वैद्यकीय समुपदेशन समिती (एमसीसी) १५ टक्के अखिल भारतीय कोट्याखाली एमबीबीएस आणि बीडीएस जागांसाठी एनईईटी ▶▶ पान २ वर...



चाकरवाडी : पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिव महापुराण कथेचे श्री क्षेत्र चाकरवाडी या ठिकाणी चांगले नियोजन केल्याबद्दल आज संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी कॅटचे महाराष्ट्राचै महामंञी व बीड जिल्हाअध्यक्ष संतोष सोहणी यांचे स्वागत करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## पेठ बीड पोलीसांची अवैध धंद्यावर कार्यवाही

### गुटखा ठेवणारा व त्याची चोरटी विक्री करणारा यांचेवर छापा मारला असता १,३९,०१७/- रू.चा मुद्येमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

दि.१३/०६/२०२५ रोजी पेठ बीड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज गोपनिय माहिती मिळाली की, भुईगल्ली या ठिकाणी मयत नामे वाजेद हसन बागवान रा. भूईगल्ली यांचे घरात, घर भाडयाने करून घरात गोवा, गोवा, आर.एम.डी., राजनिवास तंबाखू, बावा, हिरा, विमल असा वेगवेगळ्या प्रकारचा गुटखा ठेवणारा व त्याची चोरटी विक्री करत आहे. अशी खात्री लायक माहिती मिळाल्यावरून आम्ही सोबत पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज व सोबत पोह १६१३ रमेश, पोअं/१९६१ अल्ताफ, चालक पोअ/२१८० अनिल यांनी भोई गल्ली येथे मयत वाजेद हसन



बागवान रा. भूईगल्ली येथे शेख खदीर शेख बशीर, शेख अरसलान शेख खदीर असे गुटखा ठेवून त्याची विक्री करत आहेत व ठेवत आसल्याने सदर ठिकाणी छापा मारला असता वर नमूद वर्णनाचा गुटखा जागीच टाकून वर नमूद ▶▶ पान २ वर...

## धनंजय मुंडे यांनी घेतली जिल्हाधिकारी जॉन्सन यांची भेट



बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित कामे, प्रस्ताव यांचा विविध महत्त्वाच्या विषयाच्या अनुषंगाने आज बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये परळी मतदान संघातील तसेच जिल्ह्यातील महत्त्वाच्या विषयांवर प्रदीर्घ चर्चा झाली.

**परळी मतदारसंघासह जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या विषयांवर प्रदीर्घ चर्चा**

शिरसाळा येथील मंजूर एमआयडीसी मधील उर्वरित जागेची अधिकरण प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यात यावी तसेच या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्मितीच्या अनुषंगाने पाठपुरावा करणे याबाबतही यावेळी चर्चा झाली. त्याचबरोबर बसस्थानकाचे काम, कृषी महाविद्यालयाच्या रस्त्याला निधी, धर्मापुरी किल्ल्याचे काम यांसह जिल्हा स्तरावर प्रलंबित असणारे किंवा ◀◀ पान २ वर

## ना. पंकजाताई मुंडे यांचे देशी गोवंश संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

### २२ जुलै हा दिवस ''शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन'' म्हणून साजरा होणार



मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी देशी गायींच्या संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, दरवर्षी २२ जुलै हा दिवस ''शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन'' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा अध्यादेश सरकारने निर्गमित केला आहे. यापूर्वीच देशी गायीस ''राज्यमातागोमाता'' म्हणून घोषित करण्यात आले असून, या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ यांसारख्या देशी गायींच्या जाती आढळतात. मात्र, कमी उत्पादनक्षमता व प्रजननक्षमतेमुळे या गायींच्या संख्येत सातत्याने घट होत चालली आहे. यामुळे त्यांचे जतन व संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, देशी गायींचे जतन व संवर्धन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करून अधिक उत्पादनक्षम देशी गायी तयार करण्याचे उद्दिष्ट शासनाने घेतले आहे. यासोबतच देशी गायींच्या दुधाचे, शेणाचे, गोमुत्राचे उत्पादन व विपणन यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

२२ जुलैला विविध उपक्रमांचे आयोजन

''शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन'' साजरा करताना चर्चासत्रे, शिबिरे, प्रदर्शने व विविध स्पर्धा यांचा समावेश असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. राज्य शासनाच्या आयुक्त, ◀◀ पान २ वर

## बच्चु भाऊ कडु यांच्या अन्नत्याग आंदोलनाला लिंबागणेशकरांचा पाठिंबा

लिंबागणेश । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफीसह , शेतीमालाला हमीभाव, शेतमजूर,दिव्यांग, ग्रामपंचायत कर्मचारी, विविध प्रश्नासंदर्भात प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चु भाऊ कडु यांचे राष्ट्रसंतांच्या महासमाधीपुढे गुरूकुंज मोझरी येथे गेल्या ७ दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू असुन बच्चु कडु यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे कटु सत्य असुन शेतमालाला भाव नाही, राज्यात शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत.सत्ताधाऱ्यांनी



निवडणुकीत दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पाळले नाही.आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी हताश होऊन टोकाचे पाऊल उचलुन आपले जीवन संपवत आहे. अवकाळी झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळत नाही.जगाचा पोशिंदा बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे मा.बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ आज दि.१४ शनिवार रोजी सकाळी लिंबागणेशकरांनी मुख्य प्रवेशद्वार याठिकाणी बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ व शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे '' शेतीमालाला हमीभाव मिळालाच पाहिजे, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण'' अशी घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. शेतकरी कर्जमाफीसह प्रमुख मागणीसह ईतर मागण्या मान्य करून बच्चु भाऊ कडु यांच्या जिवीतास धोका ▶▶ पान २ वर...

## परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांचे बाजीराव चव्हाण यांच्याकडून बीड येथे जंगी स्वागत!

बीड । प्रतिनिधी

राज्याचे परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक साहेब हे नुकतेच गुरुवारी दि १२ रोजी बीड जिल्ह्यादौऱ्याला आले होते. तेव्हा मंत्री प्रतापजी सरनाईक यांनी प्रथम स्वर्गीय संतोषजी देशमुख यांच्या गावी जाऊन त्यांच्या परिवाराची भेट घेतली व त्यांच्या परिवाराचे सात्वन केले. त्यानंतर त्यांनी श्री. क्षेत्र, चाकरवाडी येथे चालू असलेल्या कार्यक्रमाला उपस्थिती देऊन माऊली महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. तेथून त्यांचा ताफा बीड कडे बाजीराव चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालय बीडकडे रवाना झाला. ज्यावेळी



राज्याचे परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांच्या गाड्यांचा ताफा बीड येथील बाजीराव दादा चव्हाण यांच्या संपर्क कार्यालया बाहेर येऊन पोहचला. त्यावेळी युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांचे क्रेनच्या सहाय्याने विशाल हार घालून मान सन्मानपूर्वक मंत्र्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी त्या ठिकाणी स्वागतासाठी उभ्या असलेल्या अनेक जेसीबीच्या सहाय्याने परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांचे फुलांचा वर्षाव करून अनोखे स्वागत करण्यात आले. यावेळी मंत्री प्रतापजी सरनाईक हे बाजीराव चव्हाण यांच्या कार्यालयात पोहचले असता. कार्यकर्त्यांनी बाजीराव दादा तुम आगे बढो सरनाईक साहेब, हम तुमारे साथ हे, शिवसेना जिंदाबाद च्या घोषणा दिल्या. यावेळी यूवासेनेच्या कार्यकर्त्यांच्या घोषणानी सर्व परिसर दुमदूमला होता. मंत्री प्रतापजी ▶▶ पान २ वर...

# विमान सुरक्षेचाच कोळसा

अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान टेकऑफनंतर विमानतळाजवळ कोसळल्याने देश हादरला आहे. दोन वैमानिकांव्यतिरिक्त विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि १० क्रू मेंबर्ससह २३० प्रवासी होते. या सर्वांसह विमान ज्या वसतिगृहावर आदळले, त्यातील डॉक्टरांचा भोजन करतानाच मृत्यू झाला. भारतात विमान प्रवाशांची संख्या वाढत असताना दुर्दैवाने विमान अपघातांची संख्या जगात जास्त आहे. अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या विमान अपघातात केवळ विमानातील प्रवासी, क्रू मेंबर्स, माजी मुख्यमंत्र्यांचा बळी गेला नाही, तर हे विमान जमिनीवर कोसळताना ज्या डॉक्टरांच्या वसतिगृहावर कोसळले, त्यांतील डॉक्टरांचाही बळी गेला आहे. जगभरातील विमानांवर लक्ष ठेवणाऱ्या 'फ्लाइट रडार'च्या मते, विमानाने दुपारी १.३८ वाजता उड्डाण केले. विमानाचा एक व्हीडिओ व्हायरल झाला आहे, त्यात लँडिंग गियर (टायर्स) उघडे दिसत आहेत. विमान हळूहळू खाली जाते आणि आगीचे लोळ उठतात. लंडनला जाणाऱ्या या लांब पल्ल्याच्या विमानात टेकऑफ होण्यापूर्वी भरपूर इंधन भरले होते. व्हीडिओ पाहून एक गोष्ट स्पष्ट होते, की विमानाला इंजिनमधून जोर (वरची शक्ती) येत नाही आणि ते उंची वाढवू शकत नाही.

व्हीडिओमध्ये इंजिनमध्ये आग किंवा धूर दिसत नाही. त्यामुळे असे म्हणता येईल, की पक्ष्यांचा एक कळप विमानावर आदळला आणि इंजिनमध्ये अडकला असण्याची शक्यता आहे. विमानाच्या कॉकपिटच्या तपासणीनंतर अपघाताचे खरे कारण कळेल. अहमदाबाद विमानतळ बंद करण्याचा एक अर्थ असा आहे की, तपास पथक धावपट्टी तपासू शकते. अपघाताला धावपट्टी जबाबदार आहे का, त्याचाही शोध घेतला जात आहे. टेक-ऑफच्या वेळी झालेला हा अपघात खूप भयानक आहे. कारण त्यात इंधन भरलेले आहे. व्हीडिओ पाहिल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे विमानाचे पंख समतल आहेत आणि तोल ठीक आहे; परंतु ते खाली पडत आहे. यावरून असे दिसून येते, की विमान उंची गमावत आहे. त्याला वर जाण्यासाठी इंजिनमधून शक्ती मिळत नाही. विमानाच्या टेक ऑफमध्ये एक गंभीर टप्पा असतो. तो ओलांडल्यानंतर पायलटला समस्या आढळली, तरी तो टेक ऑफ थांबवू शकत नाही. कारण त्या परिस्थितीत अधिक नुकसान होऊ शकते. विमानाचे एक इंजिन जरी काम करत असेल, तर पायलट विमानाला उंचीवर घेऊन आपत्कालीन परिस्थितीत ते उतरवू शकला असता. याचा अर्थ विमानाची दोन्ही इंजिने निकामी होऊन ते कोसळले. इंजिनपर्यंत इंधन पुरवठा न होणे हे एक संभाव्य कारण असल्याचे त्यांनी सांगितले आणि तांत्रिक त्रुटी किंवा विद्युत बिघाडामुळे हे असू शकते. विमान उडवताना व्ही १ आणि व्ही २ गती असते. व्ही १ गतीमध्ये, पायलट उड्डाण घेण्याचा निर्णय घेतो. धावपट्टी सोडल्यानंतर, व्ही २ गती दरम्यान टेक ऑफ रद्द करता येत नाही. एअर इंडियाच्या विमानाने धावपट्टीवरून उड्डाण केले, याचा अर्थ व्ही १ गतीपर्यंत सर्व काही ठीक होते. वैमानिकाला व्ही २ गतीमध्ये समस्या आढळली असावी; पण आणीबाणीनंतरही तो टेक ऑफ रद्द करू शकला नाही. अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर पायलटने 'एटीसी'ला मेडे कॉलचा संदेश दिला आणि त्यानंतर संपर्क तुटला. त्यामुळे विमानात काय समस्या निर्माण झाली, हे तातडीने समजणार नाही; परंतु अपघाताच्या वेळी विमानाचे लँडिंग गियर (टायर) उघडे दिसले आणि पंखांचे फ्लॅप्स टेक ऑफच्या वेळी असलेल्या स्थितीत होते; परंतु वैमानिक विमानाला सहाशे ते सातशे फूट उंचीवर नेऊ शकला नाही. दोन्ही इंजिनमधून वीज न मिळाल्याने, पंखांची पातळी राखून त्याने असाधारण उड्डाण कौशल्य दाखवले आहे. वैमानिकाचा अनुभव पाहता या अपघातात मानवी चूक असण्याची शक्यता फारच कमी दिसते. एक इंजिन निकामी झाले, तरी दुसऱ्या इंजिनवर विमान हाताळता येते. विमान कोसळणे म्हणजे दोन्ही इंजिन वीज पुरवू शकत नाहीत. अहमदाबाद विमान अपघातापूर्वी वैमानिकाने तीन वेळा सिग्नल दिला होता. बहुतेक आधुनिक विमानांमध्ये संगणक-नियंत्रित इंजिन असतात. त्यामुळे, इंजिन का काम करत नाही याचे एकही कारण देऊ शकत नाही. एक कारण इंधन असू शकते; पण या विमानात ते भरपूर होते. दुसरे कारण असे असू शकते, की पाइपलाइनमध्ये ब्लॉक असल्याने इंधन इंजिनपर्यंत पोहोचत नव्हते. तिसरे कारण असे असू शकते, की संगणकाला योग्य इलेक्ट्रॉनिक सिग्नल मिळाले नाहीत. लंडनला उड्डाण करण्यापूर्वी, विमान अहमदाबादमध्ये काही तास जमिनीवर होते. 'एअर इंडिया'च्या अभियंत्यांनी या काळात सर्व काही पाहिले असेल, असे गृहीत धरले जाते. दुसरीकडे विमान वाहतूक वाढल्यामुळे विमाने आणि कामगारांचा वापर करून विमान कंपन्यांचा खर्च कमी करण्याचे उद्दिष्ट एअरलाइन्स ठेवतात. वैमानिक आणि कर्मचाऱ्यांना आता कामाचे आठवडे जास्त आहेत आणि त्यामुळे कामाचा ताण जास्त आहे. परिणामी, अपघात होण्याची शक्यता वाढण्याची शक्यता दिसून येते. थकव्याशी संबंधित सुरक्षा अपघातांचे प्रमाण वाढले आहे आणि कर्मचारी आता चुकीच्या धावपट्टीवर उतरणे किंवा इंधनाचे चुकीचे वाचन करणे यासारख्या ऑपरेशनल त्रुटींना ताण आणि झोपेचा अभाव कारणीभूत मानतात. जगातील एकूण विमान वाहतुकीत अन्य विमान कंपन्यांपेक्षा भारतीय विमान कंपन्यांच्या सुरक्षिततेकडे काहीसे दुर्लक्ष होते. त्यामुळे तर गेल्या काही महिन्यांपूर्वी संसदेत विमान प्रवासाच्या सुरक्षिततेबाबत विधेयक मंजूर करण्यात आले; परंतु तरीही विमान अपघातांची संख्या कमी होत नाही. गेल्या दोन दशकांमधील २१-२३ टक्के मोठ्या विमान अपघातांच्या तपासांचे संभाव्य कारण असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. २०२० मध्ये, 'युरोपियन एव्हिएशन सेफ्टी एजन्सी'ने मोठ्या विमानांसाठी 'कर्तव्यांसाठी कल्याण आणि तंदुरुस्तीची स्थिती' ही सर्वोच्च सुरक्षा समस्या म्हणून ओळखली. २०१० मध्ये घडलेली एअर इंडिया एक्स्प्रेस फ्लाइट ८१२ ची भयानक दुर्घटना ही वैमानिकांच्या थकव्याचा विमानांच्या सुरक्षित ऑपरेशनवर कसा मोठा परिणाम होतो, याचे एक उदाहरण आहे. १६६ प्रवाशांना घेऊन जाणारे विमान मंगळूरमध्ये लँडिंग करताना कोसळले तेव्हा १५८ जणांचा मृत्यू झाला. खरे तर, कॅप्टनच्या घोरण्याच्या आवाजाची नोंद पहिल्यांदाच कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डरने केली. जगातील सर्वात सुरक्षित हवाई कंपनीत एकाही भारतीय विमान कंपनीचे नाव नसल्याचे उघड झाले आहे. दरवर्षी एअरलाईन तज्ज्ञांचे पथक जगातील चारशे एअरलाईनच्या सुरक्षेची तपासणी करतात. गेल्या दोन वर्षांत झालेले विमान अपघात, एकूण अपघाताची संख्या, सरकारी अहवाल, विमानांचे आयुष्य आणि संख्या, पायलट प्रशिक्षणाचा दर्जा आणि एअरलाईनची आर्थिक स्थिती असे अनेक मापदंड तपासून त्याआधारे मूल्यांकन करतात. त्यानंतर सुरक्षेच्या बाबतीत एअरलाईन कोणत्या क्रमांकावर आहे याची आकडेवारी जाहीर केली जाते. अशाच प्रकारे जगातील सर्वात सुरक्षित हवाई कंपन्यांची यादी जाहीर केलेली आहे. यात एकाही भारतीय हवाई कंपनीचे नाव नाही. त्यामुळे विमान प्रवासात भारतीय प्रवासी किती सुरक्षित आहे असा सवाल केला जात आहे. 'लो कॉस्ट एअरलाईन'च्या यादीत मात्र भारताच्या सर्वात मोठ्या 'इंडिगो कंपनी'चे नाव १९ व्या क्रमांकावर आले आहे. या वर्षी टॉप २४ सर्वात सुरक्षित एअरलाईन्समध्ये अमेरिकेतील पाच एअरलाईन्स कंपन्यांचा समावेश झाला आहे. यात फ्रंटिअर (५ वा क्रमांक), साऊथवेस्ट (९ वा क्रमांक), सन कंट्री (१५ वा क्रमांक), जेटब्लू (१७ वा क्रमांक) आणि एलीजेंट एअर (२१ वा क्रमांक) यांचा समावेश आहे. दरवर्षी ४०० एअरलाईन्सचे विश्लेषण करून त्यांच्या सुरक्षेच्या विविध मानकांची तपासणी करते. या तपासणीत गेल्या दोन वर्षांत झालेल्या मोठे अपघात, एकूण घटनांची वारंवारिता, अलीकडचे अपघात, विमानांचे आयुर्मान, ऑडिट आणि विमानांची एकूण संख्या, पायलट प्रशिक्षणाचा दर्जात आणि वित्तीय स्थिती याचा विचार करून रेटिंग देत असते. कोणत्याही कंपनीतील आर्थिक अस्थिरता एअरलाइनसाठी गंभीर ऑपरेशनल आव्हाने निर्माण करू शकते. त्यामुळे तिच्या सुरक्षा क्रमवारीवरदेखील परिणाम होऊ शकतो. यामुळेच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या विमान कंपन्यांना या यादीत स्थान मिळत नाही.

# ट्रम्प-मस्क दिलजमाई; दोघांच्या गरजेची...

अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि बिलेनियर उद्योगपती एलॉन मस्क यांच्यात मतभेद झाले आणि ते पेल्यातील वादळ ठरले. दोघांनीही काल समझोता केला आणि एक बिलेनियर उद्योगपती आणि अमेरिकन अध्यक्ष यांच्यातील समझोता अखेर अस्तित्वात आला. आता त्यांच्यात समझोता झाला आहे तेव्हा त्यांच्या संबंधांकडे पाहिले असता असे लक्षात येईल की, ट्रम्प यांना अमेरिकन अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसवण्यासाठी मस्कच जबाबदार होते आणि त्यांच्या पाठिंब्यामुळेच ट्रम्प अध्यक्षपदाच्या आसनावर विराजमान झाले. दुसऱ्या टर्मसाठी ट्रम्प जेव्हा तयारी करत होते तेव्हा बिलेनियर उद्योगपतींनी त्यांच्या विजयात महत्त्वाची भूमिका साकारली यात काही शंका नाही. जसे की, अध्यक्ष हॅरी ट्रुमन यांच्या निवडीत तेव्हाचे उद्योगपती ज्यांचे नाव अद्यापही गुलदस्त्यात आहे त्यांच्यामुळे ट्रुमन अध्यक्ष होऊ शकले. त्यानंतर आता ट्रम्प आणि मस्क यांच्यात असेच नाते आहे. अर्थात ट्रम्प आणि ट्रुमन यांच्यातील फरक लक्षणीय आहे. ट्रुमन इतके कधीही तिरस्करणीय नव्हते जितके ते ट्रम्प आहेत. पण ते असो. २०२४ मध्ये ट्रम्प आणि मस्क यांच्यातील नातेसंबंध यांचे अधोरेखित झाले होते जेव्हा मस्क यांनी ट्रम्प यांच्या मोहिमेत न भूतो न भविष्यती अशी भूमिका बजावली. तेव्हापासून ट्रम्प आणि मस्क यांच्यातील जवळीक वाढली आणि व्हाईट हाऊस यांच्यात तिचा बोलबाला झाला, पण या त्यांच्या संबंधात गेल्या आठवड्यापासून तणाव सुरू झाला आणि दोघांत संघर्षाचे खटके उडू लागले. जनतेतून टीका तर होतच होती, पण त्यानंतर दोघांत तीव्र खटका उडाला. गेल्या आठवड्यात ट्रम्प आणि मस्क यांच्यात भागीदारी होती, ती तणावपूर्ण होती आणि त्यामुळे ट्रम्प आणि मस्क यांच्यातील तणावाचे रूपांतर गेल्या आठवड्यात बाचाबाचीत झालेले पाहिले. ७८ वर्षीय ट्रम्प हे माझ्याशिवाय निवडणूक जिंकू शकले नसते अशी मल्लिनाथी मस्क यांनी केली, तर ट्रम्प हे पूर्ण कृतघ्न आहेत असा आरोप त्यानी जाहीररीत्या केला. मग ट्रम्प यांच्याविरोधात महाभियोग चालवण्याची धमकी दिली. या युद्धात मस्क हे युद्ध जिंकू शकणार नाहीत कदाचित पण ते ट्रम्प यांना धडा शिकवू शकतात आणि आपली किंमत वसूल करू शकतात.



एक जगप्रसिद्ध उद्योगपती आणि दुसरा अमेरिकेचा ताकदवान सर्वात मोठा शक्तीशाली अमेरिकन अध्यक्ष यांच्यातील या संघर्षाचे परिणती काय होणार यावर जग अंदाज लावत बसले. आता जग थोडे-फार सावरले असले तरीही या संघर्षाचा परिणाम चांगला होणार नाही हे दोघांनाही माहीत आहे. ट्रम्प यांनी मस्क यांच्यात अवाढव्य उद्योगजगताला धक्का लावण्याची धमकी दिली आहे आणि मस्क यांच्या काळजाचा ठोकाच त्यामुळे चुकला, त्याने कदाचित मस्क यांना आपली धमकी मागे घेऊन ट्रम्प यांच्याशी जुळवून घ्यावे लागले असावे. या भांडणाची अपरिहार्य परिणती म्हणजे ट्रम्प यांनी आपल्याकडील सरकारी वरदहस्त मस्क यांच्या कंपन्यांना काढून घेतला आणि परिणामी मस्क यांच्या टेस्लाच्या किमती १४ टक्क्यांनी गुरुवारीच कोसळल्या. अर्थात ही एकतर्फी घोषणा नव्हती, तर मस्क यांनीही ट्रम्प यांना याची जाणीव असावी, पण त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली की, मस्क यांनी आधीच आपले मंत्रिमंडळ सोडून जायला हवे होते, पण आता दोघांनाही आपापली चूक कळून आली आहे आणि त्यामुळे दोघांनीही आपल्या समशेरी म्यान केल्या आहेत. यात विजय कुणाचा झाला अथवा कुणाचा पराभव झाला हे ज्याच्या त्याच्या भूमिकेप्रमाणे ठरेल. ट्रम्प आणि मस्क यांनी शक्तीशाली पण अनौपचारिक, पण अशक्य वाटणारी आघाडी उघडली होती, आता ती पुन्हा मजबूत झाली आहे असे वाटते, पण हे किती दिवस चालेल याचा काहीच अंदाज नाही, कारण दोघेही अहंमन्य आणि अहंकारी नेते आहेत. त्यात दोघांचेही इगो आपसात टकराव देत असतात. त्यामुळे किती दिवस हे तात्पुरते पॅचअप चालेल हे काही सांगता येत नाही.

आता हा प्रश्न आहे की, हा संघर्ष कुठे जाणार आहे. काँग्रेसच्या रिपब्लिकन खासदारांना ट्रम्प यांच्या पाठीशी सदस्य ठेवणे अवघड जाणार आहे. ट्रम्प यांनी अगोदरच मस्क यांच्या सरकारी कंत्राटांना धक्का देणे सुरू ठेवले आहे, तर मस्क यांनी आपल्याशी शत्रुत्व करतील त्यांना कव्हर देणे बंद केले आहे. त्याचा फटका ट्रम्प यांच्या सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांना बसेल. दरम्यान डेमोक्रेट्स बाजूला पडले आहेत. काहीजण मस्क यांचे स्वागत करण्यास तयार आहेत कारण मस्क यांनी त्यांच्या पक्षाला मदत केली आहे आणि त्यांना पुन्हा ते आपल्या पक्षात वळवून घेण्यास तयार आहेत, पण एकूण डेमोक्रेट्स मात्र विभागलेले आणि द्विधा मनस्थितीत आहेत. काही राजकीय तज्ज्ञांच्या मते हा झिरो सम गेम आहे. म्हणजे कोणत्याही क्षणी ट्रम्प यानी असे काही पाऊल उचलले ते रिपब्लिकन पक्षाला दुखावेल. सध्या मात्र डेमोक्रेट्स लांबून या दोन दिग्गजांमधील लढाई पाहतील आणि कुणालाही साथ देणार नाहीत अशी स्थिती आहे. अर्थात या युद्धाचा एक वाईट परिणाम समोर आला आहे तो म्हणजे नासाच्या स्पेस लीडरशिपच्या बाबतीत, नासाची अंतराळ मोहीम धोक्यात आली आहे आणि मस्क यांनी आता आपला मोहिमेला असलेला आर्थिक पाठिंबा काढून घेण्याची शक्यता असल्याने ही मोहीमच संकटात सापडली आहे. त्यामुळे अमेरिकेची अंतराळ विज्ञानातील झेपही. शाब्दिक युद्धाने सुरुवात झालेली असली तरीही आता तिची परिणती युद्धबिंदूत झाली आहे आणि अमेरिकन अंतराळ विज्ञान आणि एक्सप्लोरेशन यांना त्याचा जबरदस्त फटका बसला आहे. या आगीत ट्रम्प यांनी तेल ओतले आहे आणि मस्क यांच्या स्पेस एक्स या कंपनीशी असलेले अंतराळ करार मोडीत काढण्याची शक्यता आहे त्यामुळे ट्रम्प यांना जसा फटका बसला आहे तसाच तो मस्क यांनाही बसला आहेच. आता पुढे काय होणार ते दोघेही सांगू शकत नाही.

पान १/४ वरून

## परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक

सरनाईक बाजीराव चव्हाण यांच्या कार्यालयात पोहचताच त्यांनी बाजीराव चव्हाण यांच्या युवासेनेच्या मराठवाड्यातील चांगल्या कार्याचे तोंड भरून कौतुक केले. व पुढे ते बाजीराव चव्हाण यांच्या गावी त्यांच्या घरी भेट देण्यासाठी पोहोचले. तेव्हा त्या ठिकाणी एका कार्यक्रमात बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बाजीराव दादा चव्हाण यांचे आरोग्य सेवेच्या कार्याची आणि त्यांनी मराठवाड्यात यशस्वीपणे युवासेनाचा केलेल्या विस्ताराची दखल घेऊन बाजीराव चव्हाण त्यांच्या पाठीवर भर सभेत कौतुकाची थाप दिली. आणि बाजीराव चव्हाण यांचे तोंड भरून कौतुक केले. यावेळी उपस्थित युवासेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव (दादा) चव्हाण, तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवा नेते सुरज चुंगडे, मा. युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, मा युवासेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे, महादेव मातकर, तसेच सर्व शिवसेना, युवासैना पदाधिकारी व मोठ्या प्रमाणात गावकरी उपस्थित होते.

## डीवायएफआयच्या तालुका

सदस्य म्हणून निवड करण्यात आली.अधिवेशनाचे उद्घाटन डीवायएफआय संघटनेचे जिल्हा सचिव विशाल देशमुख यांनी केले. तसेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉम्रेड अजय बुरांडे यांनी नवीन तालुका कमिटीला सत्कार करून शुभेच्छा दिल्या. मागील कार्याचा आढावा प्रशांत मस्के यांनी मांडला. त्याचबरोबर येणाऱ्या काळामध्ये बेरोजगारी, जातीयवाद,धर्मांधता सह युवकांच्या समस्या बाबत सक्रिय होऊन आंदोलन उभे करण्याचे ठराव या अधिवेशनात घेण्यात आले.

## उच्चशिक्षितांचेही लक्ष

प्रशासन आणि बीड नगर परिषद प्रशासन इकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. मात्र आता समाजातील उच्चशिक्षित लोकांचे लक्ष कारंजा टॉवर कडे जात असून ते टॉवर समोर येऊन आपले वाढदिवस साजरे करू लागले आहेत. अशाच प्रकारे नुकतेच येथे सचिन ठोंबरे या अभियंत्यांचा वाढदिवस दिगंबर माळगे, नवनाथ तपासे, बाबा पंडित, शिवाजी सुस्कर, अंकुश आगळे, गोविंद धांडे, अमोल कुमकर, नितीन धांडे, शंकरराव जगताप, डॉ. विक्रम सिंह कपूर, मुकुंद भालेकर, मधुकर धांडे, ऐतिहासिक कारंजा टॉवर साठी संघर्षरत असलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे, गणेश तपासे, मन्यारवाडी चे सरपंच भिकू शिंदे, शेख लालू यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यामुळे ऐतिहासिक कारंजा टॉवर चा सन्मान करत येथे साजरे करण्यात येणारे वाढदिवस या ऐतिहासिक वास्तूची दूर्दशा दूर करणार का असा प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.

## बच्चु भाऊ कडू यांच्या

श्री गायके राजू यांनी केले आहे. यावेळी युवा जिल्हाध्यक्ष श्री दिनकर रिंगणे उपजिल्हाध्यक्ष श्री प्रदीप गायके युवा उपजिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनुद्दीन माजी जिल्हाध्यक्ष श्रीनिवास भोसले अंबाजोगाई विभागाचे जिल्हाध्यक्ष श्री आदित्य रांजणकर गेवराई तालुक्याचे अध्यक्ष श्री विलास खिसाडे श्री नारायण करपे श्री ऋषिकेश गायके श्री तेजस गायके श्री धर्मराज गायके श्री श्री कृष्ण गायके तसेच तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

## परमेश्वरावर विश्वास ठेवा

महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या शिवमहापुराण कथेची व अखंड हरिनाम सप्ताह सांगता होणार आहे. श्री प पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांच्या शिवमहापुराण कथेची सांगता आज सकाळी ८ वा. सुरू होणार आहे. शिव महापुराण कथा संपल्यावर माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात अखंड हरिनाम सप्ताह मध्ये काल्याचे कीर्तन श्री ह. भ. प संदीपान महाराज हासेगावकर श्री जोग महाराज वरकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र आळंदी देहू यांचे ११.३० ते १ वाजेपर्यंत काल्याचे कीर्तन होईल त्या नंतर महाप्रसादाची महापांगत होईल.

शिवमहापुराण कथेस मुख्य उपस्थिती शंकराचार्य शृंगेरी पीठ मान्यता प्राप्त आचार्य अभिनव विद्या नरसिंह भरती स्वामी महाराज श्री क्षेत्र शृंगेरी हे आपल्या शिष्य गणा समवेत माऊली दादाच्या समाधीच दर्शन घेऊन प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस उपस्थित राहून कथेस आलेल्या भाविक भक्तांना आशीर्वाद दिले.

## मान्यराची भेट

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, माजी मंत्री सुरेश धस, माजी मंत्री अशोक पाटील, खासदार रजनीताई पाटील, खा. बजरंग सोनवणे, माजी नगराध्यक्ष पापा मोदी, अनेक नामांकित दैनिकाचे संपादक,उपसंपादक,वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## शासकीय औद्योगिक

सद्यस्थिती यावर उजाळा देत उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आयएमसी सोसायटी औ.प्र.सं.माजलगाव चे पदसिध्द सदस्य प्रविण येताळ हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून कमलाकर जोशी, तुकाराम येवले, संभाजी शेजूळ हे उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी ज्ञानवर्धिनी कोचिंग क्लासेसचे संचालक अशोक काळे हे प्रमुख वक्ते म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी अशोक काळे यांनी नागरी कर्तव्य व शिष्टाचार या विषयावर उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बाबासाहेब घाटूळ यांनी केले तर प्रास्ताविक एन.पी.पटवी यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ए.ए.पठाण यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे प्राचार्य एस.ओ.बनगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.यावेळी संस्थेतील सर्व कर्मचारी आणि सर्व ट्रेडचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## पेठ बीड पोलीसांची

आरोपी पोलीस पार्टीस पाहून पळून गेल्याने त्यांचेवर पोलीस स्टेशन पेठ बीड येथे गु.र.नं. १६९/२०२५ कलम १२३,२७४,२७५ भा.न्या.सं. २०२३ प्रमाणे वर नमूद आरोपी यांचे ताब्यातील असलेल्या घरामध्ये वरील वर्णणाचा गुटखा किंमत- १,०९,०१७/-रूपायाचा गुटखा व मोटारसायकल -२३ ६३३६ असा एकूण १,३९,०१७/-रूपायाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक सो नवनीत काँवत साहेब, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो सचिन पांडकर, मा. उपविभागीय पोलीस अधीकारी यांचे नेतृत्वाखाली मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज, पोह १६१३ रमेश, पोअं/१९६१ अल्ताफ, चालक पोअ/२१८० अनिल सर्व नेमणूक पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी पार पाडली.

## बच्चु भाऊ कडु यांच्या

असुन परिस्थिती चिघळण्या अगोदरच बेमुदत आमरण उपोषण सोडवण्याची मागणी करत बच्चु भाऊ कडु यांना ईमेल द्वारे आपला पाठिंबा दर्शविला आहे. निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाठवले आहे.यावेळी राजेभाऊ गिरे, भिम टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष नितिन सोनावणे, विक्रांत वाणी, रामकिसन गिरे, संतोष भोसले, सय्यद अख्तर, सुरेश निर्मळ,आरूण निर्मळ, राहुल जाधव, तुकाराम गायकवाड, रामदास मुळे, अर्जुन गोंडे,आश्रुबा गिरे, भगवान मोरे, रामकिसन गिरे,लहु घोलप, दत्ता घरत, तुषार गायकवाड,शहाजी वाणी, भालचंद्र गिरे,लहु घोलप आदी सहभागी होते.

## ना. पंकजाताई मुंडे यांचे देशी

पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या संयुक्त विद्यमाने या दिवसाचे आयोजन करण्यात येणार असून, यासाठी लागणारा खर्च गोसेवा आयोगाच्या निधीतून करण्यात येणार आहे.

राज्यातील देशी गोवंशाच्या जतनासाठी व लोकजागृतीसाठी शासनाने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह ठरत असून, स्थानिक देशी गायांच्या संवर्धनासाठी एक सकारात्मक पाऊल असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

## निट युजी परीक्षेत

यूजी २०२५ द्वारे समुपदेशन प्रक्रिया आयोजित करते. स्कोअरच्या आधारे, वैद्यकीय समुपदेशन समिती () , आणि इतर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी समुपदेशन २०२५ आयोजित करेल. या अंतर्गत, १५ टक्के अखिल भारतीय कोटा () साठी समुपदेशन करेल. तर ८५ टक्के जागा राज्य समुपदेशनाद्वारे भरल्या जातील.

परीक्षा ४ मे रोजी घेण्यात आली

- परीक्षा ४ मे रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत देशभरातील ५ हजारांहून अधिक केंद्रांवर घेण्यात आली. ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमांमध्ये थेट प्रवेश मिळेल.

लवकरच समुपदेशन सुरू होईल

समुपदेशन फॉर्म भरताना, तुम्हाला आणि दोन्हीसाठी समान धडक द्यावी लागेल. अशा परिस्थितीत, निवड भरताना प्राधान्य निश्चित करावे लागेल. राज्य गणना फेरी १ ही पहिल्या अखिल भारतीय कोटा () फेरी १ नंतरच सुरू होईल. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला पहिल्या मध्ये प्रवेश मिळाला नाही, तर तुम्ही राज्य समुपदेशनात प्रवेश घेऊ शकता. त्याचप्रमाणे, ती दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या फेरीसाठी असेल. त्याची तारीख इत्यादी माहिती आणि राज्य सरकारच्या समुपदेशन संस्थेच्या अधिसूचनेत उपलब्ध असेल.

६६० गुण असल्यास सरकारी महाविद्यालय मिळू शकते

वैद्यकीय प्रवेश कार्यकारी रिया शर्मा म्हणाल्या की, यावर्षी सरकारी महाविद्यालयात मध्ये प्रवेशासाठी सामान्य कटऑफ ६६० ते ६७० आणि इतर राखीव श्रेणींसाठी ५९० ते ६०० अपेक्षित आहे. त्याच वेळी, साठी सामान्य कटऑफ ५००+ आणि इतर राखीव श्रेणींसाठी ४५०+ अपेक्षित आहे. अनेक उमेदवारांना चांगल्या आणि कमी फी असलेल्या सरकारी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळत नाही. अशा परिस्थितीत, उमेदवार इतर देशांमध्ये एमबीबीएस करण्याचा पर्याय निवडतात. असे अनेक देश आहेत जिथे वैद्यकीय अभ्यास आणि वसतिगृहाचा खर्च कोणत्याही खाजगी भारतीय महाविद्यालयापेक्षा कमी आहे. पहिल्या दहामध्ये राजस्थान, मध्य प्रदेश आणि दिल्लीतील प्रत्येकी एक विद्यार्थी आहे.

टॉप टेन विद्यार्थी

रँक १: महेश कुमार, ९९.९९९९५४७ पर्सेंटाइल, राजस्थान
रँक २: उत्कर्ष अवधिया, ९९.९९९९०९५ टक्केवारी, मध्य प्रदेश
रँक ३: कृशांग जोशी, ९९.९९९८१८९ पर्सेंटाइल, महाराष्ट्र
रँक ४: मृणाल किशोर झा, ९९.९९९८१८९ पर्सेंटाइल, दिल्ली
रँक ५: अविका अग्रवाल, ९९.९९९६८३२ पर्सेंटाइल, दिल्ली
रँक ६: जेनिल विनोदभाई भयानी, ९९.९९९६८३२ पर्सेंटाइल, गुजरात
रँक ७: केशव मित्तल, ९९.९९९६८३२ पर्सेंटाइल, पंजाब
रँक ८: झा भव्य चिराग, ९९.९९९६३७९ पर्सेंटाइल, गुजरात
रँक ९: हर्ष केदावत, ९९.९९९५४७४ पर्सेंटाइल, दिल्ली
रँक १०: आरव अग्रवाल, ९९.९९९५४७४ पर्सेंटाइल, महाराष्ट्र

## धनंजय मुंडे यांनी

जिल्हा स्तरावरून प्रस्तावित करावयाच्या विविध विकासकामांच्या अनुषंगाने धनंजय मुंडे यांनी सूचना केल्या.

यावेळी माजी आ. संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण, अविनाश नाईकवाडे, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी, पुरातत्व विभागाचे अधिकारी, यांसह आदी उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शिबिर

बीड । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते या रक्तदान शिबिराला राजकीय मंडळी सामाजिक कार्यकर्ते पत्रकार बांधव विविध पक्षातील मान्यवर यांनी भेट दिली. यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, बीड शहराध्यक्ष लखन काका जोगदंड मिलिंद सरपते पाटोदा तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सोमीनाथ कोल्हे तसेच पाटोदा तालुक्यातील सर्व पत्रकार संघटनेचे सर्व अध्यक्ष व त्यांचे सर्व सदस्य शिवशंभो जिल्हा अध्यक्ष लखन वीर तालुका अध्यक्ष अनिकेत जावळे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख दत्ता वाघमारे इत्यादी मान्यवर उपस्थित होते पाटोदा तालुक्यातील युवकांनी या रक्तदान शिबिराला चांगला प्रतिसाद दिला फक्त यावर्षीही ३३ लोकांनी रक्तदान केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन इंनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन दीपक थोरात यांनी केले.

# पत्रकारांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी निवेदन; जिल्हा माहिती अधिकाऱ्यामार्फत माहिती संचालकांना पत्रकारांसाठीच्या योजनांच्या नियमात सुधारणा करणे बाबत सूचनांचे निवेदन

बीड /प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा शाखेच्या वतीने बीड जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांच्यामार्फत माहिती व जनसंपर्क विभाग मंत्रालय मुंबईचे संचालक डॉ. गणेश मुळे यांना पत्रकारांसाठीच्या योजनांच्या नियमात सुधारणा करणे बाबत निवेदन देण्यात आले या निवेदनात पत्रकारांच्या योजनांसाठी असलेल्या जाचक अटी काढून टाकाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

मराठी पत्रकार परिषद गेल्या अनेक दिवसापासून पत्रकारांसाठीच्या विविध योजनांच्या आटी आणि नियमात बदल करावेत अशी मागणी सातत्याने करत आहे. या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेऊन यात काही सुधारणा करण्याची तयारी दाखवली आहे. यात काय बदल अपेक्षित आहेत. अशा सूचना करणारे निवेदन जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या मार्फत संचालक डॉ. गणेश मुळे यांना देण्यात आले या निवेदनामध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेसाठी वयाची अट ५८ वर्ष व अनुभवाची अट २५ वर्षे करावी. सलग तीस वर्षे सेवा ही अट रद्द केली जावी. ज्यांच्याकडे विना खंड सलग तीस वर्षे अधिस्वीकृती पत्रिका आहे आणि ज्यांचे वय ५८ वर्ष आहे अशा पत्रकाराला सन्मान योजनेचा लाभ दिला जावा. महाराष्ट्रात असंख्य पत्रकार असे आहेत की त्यांच्याकडे तीस वर्षांपूर्वीची कागदपत्रे मिळत नाहीत. त्यामुळे पत्रकार योजना पासून ते वंचित राहतात. अशा स्थितीत जिल्हा माहिती अधिकारी आणि जिल्हा मराठी पत्रकार संघाचे शिफारस पत्र ग्राह्य समजले जावे. शिवाय संबंधित पत्रकाराचे प्रतिज्ञापत्र घेतले जावे. अनेक साप्ताहिकाच्या प्रेस लाईन वर मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक म्हणून एकाच व्यक्तीचे नाव असते मुद्रक अथवा प्रकाशक म्हणून नाव आहे म्हणजे तो पत्रकार अन्य व्यवसाय करतो असे नाही. ते फक्त सोयीसाठी असते. त्यामुळे प्रकाशक आणि मुद्रक म्हणून नाव असणाऱ्यांचा तो अन्य व्यवसाय आहे असे समजू नये त्यालाही लाभ मिळावा. उत्पन्नाची अट दोन लाखावरून वाढवून ती पाच लाख करावी. सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या एखाद्या पत्रकाराचे निधन झाले तर त्याच्या पत्नीला ती हयात असेपर्यंत या योजनेचा लाभ मिळावा. पत्रकार महिला असेल तर तिच्या पश्चात तिच्या पतीला हा लाभ मिळावा. अशा सूचना करण्यात आल्या. याशिवाय शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीबाबत काही सुधारणासाठी सूचना करण्यात आल्या आहेत. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण मुदत ठेवीतून मिळणाऱ्या व्याजातून ही योजना चालविण्यापेक्षा या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जावी. त्यामुळे पत्रकारांसाठीच्या योजनांना निधीची कमतरता भासणार नाही .शंकराव चव्हाण निधीचे जे विश्वस्त मंडळ आहे त्यांच्या बैठका नियमित होत नाहीत दर दोन महिन्यांनी या ट्रस्टच्या बैठका झाल्या तर पत्रकारांचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत. आरोग्य योजनेचा लाभ देताना ठराविक आजाराची मर्यादा रद्द करून ही योजना सर्व प्रकारच्या आजारासाठी लागू करावी. अनेकदा असे आढळून आले आहे की बऱ्याच पत्रकारांचे मेडिक्लेम असतात अशा पत्रकारांना त्याची सर्व ओरिजनल कागदपत्रे विमा कंपन्यांना द्यावी लागतात. परिणामतः अशा पत्रकारांना योजनेचा लाभ मिळत नाही .अशा पत्रकारांची हॉस्पिटलची झेरॉक्स कागदपत्रे ग्राह्य धरली जावीत आणि महत्त्वाचे म्हणजे या योजनेसाठी असलेली आधिस्वीकृती पत्रिकेची आठ रद्द केली पाहिजे. राज्यात केवळ आठ टक्के पत्रकारांकडेच आधिस्वीकृती असल्याने ९२ टक्के पत्रकार या अटीमुळे योजनेच्या लाभांपासून वंचित राहतात. पत्रकारांच्या मृत्यूनंतर किमान पाच लाख रुपयांची मदत संबंधित पत्रकाराच्या पत्नीला किंवा मुलांना मिळाली पाहिजे. ही रक्कम मृत्यूनंतर एक महिन्याच्या आत तातडीने दिली जावी त्यासाठी देखील आधिस्वीकृती पत्रिकेची अट नसली पाहिजे आमची सरकारला विनंती आहे की या सूचनांचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणी ही या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, विभागीय संघटक सुभाष चौरे ,विभागीय सचिव रवी उबाळे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय अरबुणे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर , जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत , तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदिंच्या सह्या आहेत.

# परळीकडून लातूरमार्गे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा द्या ;राजेभाऊ फड यांचे रेल्वे मंत्र्यांना पत्र

परळी वैजनाथ प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ हे देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असे पाचव्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग आहे. दररोज येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्याचबरोबर परळी वैजनाथ रेल्वे स्थानक हे जिल्ह्यातील सर्वात जुने आणि एकमेव स्थानक असून येथील प्रवासी संघटनांच्या काही प्रमुख मागण्या आहेत. त्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून मार्गी लावाव्यात यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री तसेच दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक यांना पत्र लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी अनेक मागण्या केल्या आहेत. याबाबत अधिक असे की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्याकडे अनेक रेल्वे प्रवाशांनी विविध समस्या मांडल्या होत्या. त्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री



अश्विनी वैष्णव तसेच सिकंदराबाद विभागाचे व्यवस्थापक यांना पत्र लिहून प्रवासी संघटनेच्या मागण्या पोचवल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने म्हटले आहे की, परळी वैजनाथ येथून लातूररोड रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना मतदारसंघातील घाटनांदूर येथे थांबा देण्यात यावा. जेणेकरून परळी, अंबाजोगाई तसेच लातूर जिल्ह्यातील अहमदपूर आणि रेणापूर तालुक्यातील प्रवाशांची सोय होणार आहे. याचबरोबर कोरोना महामारीच्या काळात काही रेल्वे गाड्या बंद करण्यात आल्या होत्या, त्यापैकी अमरावती - पुणे तसेच काकीनाडा - साईनगर (शिर्डी) या गाड्या नियोजित वेळापत्रकानुसार नियमित सुरू ठेवण्यात याव्यात. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता काही गाड्यांच्या डब्यांच्या संख्येत गरजेनुसार वाढ करण्यात यावी, जेणेकरून प्रवाशांची गैरसोय होणार नाही अशा आशयाचे पत्र राजेभाऊ फड यांनी प्रवासी संघटनांच्या आग्रहास्तव केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना पाठवले आहे.

# राज्यस्तरीय जी-चॅम्प अबॅकस स्पर्धेत सद् गुरु अकॅडमीचे दमदार यश बीडचे नाव राज्यपातळीवर उज्वलतेने झळकले

बीड प्रतिनिधी

राज्यस्तरीय जी-चॅम्प अबॅकस स्पर्धेत बीडच्या सद् गुरु अकॅडमीने मोठे यश मिळवत, शिक्षण क्षेत्रात आपली ठसा उमटवला आहे. दिनांक ८ जून रोजी संभाजीनगर येथे झालेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत आदित्य नगरी, भक्ती कन्स्ट्रक्शन बीड येथील सद्गुरु अकॅडमीच्या २१ जणांच्या विद्यार्थ्यांच्या चमूने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत मिहीर महेश भट, साईराज गणेश पवार, प्रीती रवींद्र जगताप, श्रेयश जगदीश डांगे, उत्कर्ष उत्तरेश्वर घुमरे, विश्वेश किशोर कोळपकर या सहा विद्यार्थ्यांनी 'सुपरस्टार' ट्रॉफी पटकावत सर्वोच्च सन्मान मिळवला. तसेच सृष्टी रामदास आघाव, अबोली अमोल माने, समर




प्रकाश भिंगळे यांनी प्रथम क्रमांक, आराध्या संदीप गुंजाळ, गणेश महेश साळप्पा, प्रभास गोविंद शिंदे, श्रुती जगदीश डांगे यांनी द्वितीय क्रमांक आणि अखिलेश रामदास आघाव, गौरव सतीश बोबडे यांनी तृतीय क्रमांक मिळवून आपली प्रतिभा सिद्ध केली. सुमारे ७५% विद्यार्थ्यांनी कमी वेळेत १००% अचूक गणनापद्धतीने आपले पेपर पूर्ण करत स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे सद् गुरु अकॅडमीचे नाव राज्यस्तरावर झळकले असून, बीड शहरासाठीही हे एक अभिमानाचे क्षण ठरले आहेत. या यशामागे मार्गदर्शक शिक्षिका सौ. शैलेजा गणेश वाघ व सौ. स्वाती विठ्ठल चिवटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल सर्व पालक आणि नागरिकांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# निकाल लागण्याच्या आधीच महाविद्यालयातील तृतीय वर्षातील विद्यार्थी मिडिया या आंतरराष्ट्रीय कंपनी मध्ये रुजू

बीड : या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, म. शि.प्र.मंडळ संचालित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन,बीड हे दर्जेदार शिक्षणा सोबतच विद्यार्थ्यांना नेहमी चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत असते.त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाने मायडिया इंडिया प्रा.लि पुण्यशोक अहिल्यानगर ज्याचे मुख्य कार्यालय चीन मध्ये आहे या आंतरराष्ट्रीय कंपनीचे कॉम्पस इंटरव्ह्यू चे आयोजन केले होते.या कंपनीने मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक शाखेतील ४१ विद्यार्थ्यांची ट्रेनी इंजिनीयर या पदावर निवड केलेली आहे. ज्या विश्वासाने पालक व विद्यार्थी या महाविद्यालयात प्रवेश घेतात तोच विश्वास नेहमी कायम ठेवून आम्ही प्रत्येक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतोय. कॅम्पस मुलाखतीत निवड झालेले विद्यार्थी आज मायडिया इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, अहिल्यानगर येथे रुजू होण्याकरिता कंपनी मार्फत महाविद्यालयात बस पाठवली व विद्यार्थी कंपनीच्या निगराणीखाली येथून रवाना झाले आहेत या विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षी ३.५० लाख इतके पॅकेज मिळणार आहे, त्यामध्ये कॅन्टीन,बस सुविधा पण मिळणार आहे,ही विद्यार्थ्यांसाठी फार मोठी सुवर्ण संधी लाभलेली आहे.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी सांगितले की,महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना चागल्या शिक्षणा बरोबरच चांगल्या कंपनी मध्ये नोकरीची हमी पण महाविद्यालया मार्फत मिळते तसेच आज महाविद्यालयामधील असंख्य विद्यार्थी हे उच्च पदावर व चांगल्या वेतनावर कार्यरत आहेत हि आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे व विद्यार्थ्यांना चांगला रोजगार मिळवा यासाठी महाविद्यालय हे नेहमी प्रयत्नशील राहणार आहे जो विद्यार्थी प्रवेश घेतो तो महाविद्यालया सोबत कायमचा जोडला जातो आपल्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान अद्ययावत व्हावे या दृष्टीने या वर्षीपासून आम्ही बीड जिल्ह्यामध्ये प्रथमच आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लॉर्निंग ही नवीन शाखा सुरू केलेली आहे याचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य यांनी केले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव मा.श्री.सतिश (भाऊ) चव्हाण साहेब, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले, महाविद्यालयाचे टी.पी.ओ प्रमुख प्रा. धुमाळ बी.आर सर्व शाखांचे विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राज्याच्या राजकारणातून वैचारिक पातळी व संवेदना नावाची गोष्ट तसेच सुसंस्कृतपणा राजकारणातून संपला

बीड. प्रतिनिधी

२०१४ साला पासून राजकीय पक्षांकडून जाती व धर्माचा नावावर देशाला व राज्याला अस्थिर ठेवण्याचे काम जोरदार सुरू आहे या राजकीय पक्षांच्या नेत्यांना देशाच्या व राज्याच्या विकासापेक्षाही जात आणि धर्म हा विषय महत्वपूर्ण वाटू लागला आहे २०१४ सालापासून देशात व राज्यात निवडणुका देखील जाती आणि धर्मावर लढवल्या गेल्या आहेत २०१४ पासून राज्यातील एकाही आमदाराने खासदाराने मंत्र्याने बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, महागाई, महिला सुरक्षा, शेतकरी आत्महत्या, शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव द्या या प्रश्नावर दोन्ही सभागृहात आवाज उचलला नाही पण जाती धर्माच्या नावावर तसेच नाही त्या मुद्द्यावर यांनी सभागृह बंद पाडले. गल्लीमध्ये नळाच्या पाण्यासाठी ज्या पद्धतीने महिलांचे वाद होतात त्याच पद्धतीने सभागृहात आमदार एकमेकांशी जाती धर्मावरून वाद घालत होते अधिवेशन काळात पवित्र अशा सभागृहामध्ये आमदार एकमेकांविरुद्ध खालच्या स्तरावर जाऊन वक्तव्य करीत होते तिकडे जग चंद्रावर व सूर्यावर चालले आहे आणि आपले आमदार खासदार मंत्री जाती, धर्माचे मुद्दे सभागृहात पुढे करून एकमेकांचे उणेदुणे काढण्यात व्यस्त होते काही आमदार मंत्री दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी वक्तव्य करत होती सध्याच्या राजकारणातून सुसंस्कृतपणा हद्दपार झाला आहे महापुरुष व साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत महाराष्ट्रात राजकर्त्यांकडून असे दिवस बघायला मिळतील हे जनतेला वाटले नव्हते राजकीय पक्षातील आमदार खासदार मंत्री या वाचाळ वीरांना बघून म्हणावेसे वाटते की राज्याच्या राजकारणातून वैचारिक पातळी, संवेदना तसेच सुसंस्कृतपणा संपत चालला आहे

# सौ. के.एस.के. उर्फ काकू कृषी महाविद्यालयांच्या कृषीकन्यांचे पिंपरगव्हाण गावामध्ये आगमन

बीड प्रतिनिधी

ग्रामीण कृषी जागरूकता व कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि विविध उपक्रम घेण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत असलेल्या सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के) उर्फ काकू कृषी महाविद्याल, बीड येथील कृषिकन्यांचे पिंपरगव्हाण गावामध्ये आगमन झाले आहे. यावेळी गावातील सरपंच अशोक आगाम, मंडळ कृषी अधिकारी सोनवणे बी.ए., कृषी अधिकारी पी.एम.नाळवे, कृषी सहाय्यक मीरा बोतरे व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सहसचिव डॉ.जी.व्ही.साळुंखे, प्राचार्य डॉ.एस.पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ.एस.टी.शिंदे व महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इथून पुढे अडीच महिने हे विद्यार्थी या ठिकाणी खरीप हंगामातील विविध पिकांबाबतीत माहिती देणारा असून विविध प्रत्यक्षीके शेतकऱ्यांना करून दाखवणार आहेत. यासोबतच शेतकऱ्यांचे उत्पादन कसे वाढेल यावर चर्चासत्र आणि अंमलबजावणी करणार आहेत. विविध शेतीपूरक व्यवसाय, प्रकल्प, शासकीय योजना यांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात या कृषीकन्यांचा महत्त्वाचा सहभाग असणार आहे. महाविद्यालय प्रशासन नेहमीच विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून शेतकऱ्यांच्या शाश्वत विकासाकडे सातत्याने लक्ष देत आहे. यावेळी कृषिकन्या चव्हाण असावरी, डोके आरती, परजणे गीताश्री, परजणे वैष्णवी, पवळ साक्षी, उगले सुप्रिया, पवळ उषा व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या कृषिकन्यांचे स्वागत ग्रामपंचायत पदाधिकारी आणि गावकऱ्यांनी केले. यावेळी गावातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# वरळी येथे आचार्य अत्रे यांना अभिवादन

मुंबई येथे मुंबई महापालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडणारे अत्रेच होते. महाराष्ट्र कृती समिती स्थापनेत अत्रेचा पुढाकार होता. महाराष्ट्रासाठीच जगण्या मरण्याची भावना मराठी माणसांच्यात चेतवत ठेवण्याचे काम अत्रे व त्यांच्या लेखणीने समर्थपणे केले. अत्रे यांच्या वाणी व लेखणीने लढ्यात दिलेले योगदान फार प्रभावी व अमूल्य आहे. अत्रे यांचे विविध पैलू असलेले व्यक्तिमत्त्व प्रसिद्ध आहेच.मुंबईसह अपेक्षित "महाराष्ट्र राज्य नावास आकाराला येण्यात अत्रेचा वाटा मोठा आहे. विविध मार्गानी अत्रे यांनी संयुक् महाराष्ट्र निर्मितीची गाथा लोकमनात रुजविली त्यामुळे हा लढा यशस्वी झाला. मुंबई मिळवण्यासाठी मराठी माणसांनी जो त्याग केला लढा उभारला ते सध्याची मुंबईची परिस्थिती पाहता भविष्यात मुंबईवर मराठी माणसांचा सर्वाधिकार राहील काय याचे आत्मपरीक्षण आजच्या महाराष्ट्रातील मराठी राज्यकर्त्यांनी करायला पाहिजे. निरक्षर कवयत्री बहिणाबाई यांच्या कविता अत्रे यांनी अधाशासारख्या वाचल्या आणि त्यांना आणि त्यांचे साहित्य महाराष्ट्रापुढे आणले. अत्रेसाहेब हे महाराष्ट्राचे सर्वव्यापी बलदंड व्यक्तिमत्व होते. अशी भावना कुटुंब रंगलय काव्यात चे विसुभाऊ बापट, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे आणि शरद बर्डे यांनी व्यक्त केली. साहित्य सम्राट आचार्य अत्रे यांच्या ५६ व्या पुण्यस्मरणार्थ मुंबई वरळीनाका येथील आचार्य अत्रे चौकात त्यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यापुढे अत्रेसाहेबांना अभिप्रेत असे अनेक उपक्रम राबविण्यासाठी यापुढे आचार्य अत्रे समिती महाराष्ट्र राज्य या नावाची संस्था स्थापन होत असल्याची घोषणा आरती सदावर्ते-पुरंदरे यांनी केली. कार्यक्रमाला ज्येष्ठ निवेदिका मधू मंजिरी गटणे, श्रीकांत मयेकर, श्रीमती सविता झेंडे या उपस्थित होत्या.

# आधिस्वीकृती धारक पत्रकारांच्या बस सवलतीसाठी मंत्री सरनाईक यांना निवेदन

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सर्व आधी सुकृती धारक पत्रकारांना नवीन आलेल्या इलेक्ट्रॉनिक शिवाई व स्लीपर सेमी स्लीपर कोच मध्ये सवलत मिळावी या मागणीसाठी बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देण्यात आले. बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर यांनी हे निवेदन दिले. यावेळी उपमुख्यमंत्री आरोग्य सुविधा प्रमुख बाजीराव चव्हाण यांची उपस्थिती होती. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना दिले निवेदनात मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे की महाराष्ट्र शासनाच्या वतीने अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना बस प्रवास मोफत दिला जातो. मात्र सध्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे नवीन इलेक्ट्रिक शिवाई बस आलेल्या आहेत. या गाड्यांना पत्रकारांसाठी मोफत बस प्रवास सवलत दिली जात नाही. याशिवाय महामंडळाच्या सेमी- स्लीपर



बसलाही सवलत लागू होत नाही. महोदय महाराष्ट्रातील २५% पत्रकारही बस ने प्रवास करीत नाहीत. जे करतात त्यांची अर्थिक अडचण असते अशा पत्रकारांचा सन्मान व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. एस टी महामंडळाच्या सर्वच गाडचांना आधिस्वीकृतीधारक पत्रकारांसाठी सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी आमची विनंती आहे. शिवाई इलेक्ट्रिक गाड्यांना ज्येष्ठ नागरिक, महिला, अपंग यासारख्या सवलती उपलब्ध आहेत. मात्र फक्त पत्रकारांसाठीच या गाड्यांमध्ये मोफत प्रवासाची सवलत नाही. आपण आपल्या स्तरावर संबंधितांना सूचना देऊन महाराष्ट्रातील आधिस्वीकृती धारक पत्रकारांना या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे .या निवेदनावर विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे ,हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत , जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, संपादक राजेंद्र होळकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदींच्या सह्या आहेत.


BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे




सायं.दैनिक
बीड
प्रारंभ
शनिवार दि. १४ जून २०२५






# परमेश्वरावर विश्वास ठेवा अंधविश्वास ठेऊ नका - प. पूज्य प्रदीप मिश्राजी

## आज चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताह सांगता होणार

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

**शिव परमेश्वरावर विश्वास ठेवा परमेश्वरावर ठेवलेला विश्वास तुमच्यात आत्मविश्वास निर्माण करेल, त्या आत्मविश्वासाच्या जोरावर तुमच्या आयुष्यात कार्य सिद्धी होईल, परंतु फक्त अंधविश्वास ठेऊ नका. अंधविश्वास तुमच्या आयुष्याच नुकसान करतो. त्यामुळे प्रत्यकाने शिव परमेश्वरावर विश्वास ठेवावा असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प. पूज्य प्रदीप मिश्राजी यांनी केले. दरम्यान आज शनिवार रोजी चाकरवाडी येथे सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेचा सांगता समारंभ होणार आहे.**

चाकरवाडी येथे विषया शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी गुरुवर्य महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेत प्रदीप मिश्रा बोलत होते बोलत. यावेळी पुढे बोलताना मिश्राजी म्हणाले की, शिव,



विष्णू, नारायण, पांडुरंग, कृष्ण, कन्हैया, माऊली दादा महाराज कोणताही नामस्मरण करा सर्व एकच आहे.

कोणाची प्रगती पाहिल्यावर आपण त्याच्या पेक्षा मोठी झेप घ्यावी परंतु कोणाविषयी जळाऊ वृत्ती ठेऊ नये, कोणी एखादी गाडी घेतली तर आपण मोठी गाडी घ्यावी, परंतु त्याच्या गाडीवर कोणीही जळू नये हि जळाऊ वृत्ती संपवणे गरजेचे आहे. त्यामुळे अध्यात्म गरजेचे असून शिवभक्ती करणे काळाची गरज आहे शिवभक्ती केल्याने मानवी आयुष्यात आनंद निर्माण होईल व देवावरील भक्ती मुळे वृत्ती माणसातून कमी होईल त्यामुळे श्रद्धापूर्वक शिवभक्ती करा असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प पूज्य प्रदीप मिश्राजी यांनी केले.

आज होणारे कार्यक्रम

आज दि १४ जून शनिवार रोजी चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव ▶▶ पान २ वर...



संत वै. ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली यांच्या रौप्य महोत्सवी पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह तसेच श्री. प्रदीप मिश्रा यांच्या वाणीतून सुरू असलेल्या शिव महापुराण कथेचा आज समारोप होत असून, याप्रसंगी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे चाकर वाडी येथे उपस्थित राहिले. यावेळी त्यांनी श्री प्रदीप मिश्रा तसेच महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. या सोहळ्याच्या अंतिम दिवशी आज महापंगतीला महाप्रसाद देण्याचा मान परळी करांना आयोजकांच्या वतीने देण्यात आलेला असून, याबद्दल धनंजय मुंडे यांनी आयोजकांचे आभार मानले.

# घरकुल धारकांनी कुणालाही रूपया देऊ नये -बागलाने

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यात जवळपास नवीन घरांसाठी वीस हजार पेक्षा अधिक मागणी अर्ज बेघर धारकांनी केले आहेत.आता नविन मंजूर झालेल्या घरकुल धारकांनी कुणालाही एक रूपाया देऊ नये,जर कुणी मागणी केली तर त्याची तक्रार आमच्याकडे रितसर करावी आणि यंदाची दिवाळी नव्या घरात साजरी करावी असे आवाहन आष्टी पंचायत समिती चे गटविकास अधिकारी जी.व्ही.बागलाने यांनी केले आहे.

आष्टी पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकारी यांच्या कक्षेत शुक्रवार (दि.१३)रोजी दुपारी ४.३० वा.पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.पुढे बोलतांना ते म्हणाले,पक्के आणि प्रशस्त घर असावे हे प्रत्येकाचं स्वप्न असत.केंद्र व राज्य सरकारच्या संकल्पनेतून व आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आष्टी तालुक्यात जवळपास २० हजारांपेक्षा जास्त गरजूंनी अर्ज दाखल केले आहेत.आता ह्या घरांची स्वप्न येत्या दिवाळीत पुर्ण होऊन यंदाची दिवाळीच नव्या घरात घरकुल धारकांनी साजरी करावी.परंतु ही नव्या घरात दिवाळी साजरी करण्यासाठी कुणाला रूपाया देण्याची गरज नाही असे आवाहन गटविकास अधिकारी बागलाने यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सुरु असलेल्या बच्चू कडूंच्या अन्नत्याग आंदोलनाला युवक काँग्रेसचा पाठिंबा : ॲड श्रीनिवास बेदरे

**गेवराई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात प्रहार संघटनेचे अध्यक्ष, माजी मंत्री बच्चू कडू यांचे गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. कडू यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे वास्तव आहे, शेतकरी आज मोठ्या संकटात आहे, शेतमालाला भाव नाही, राज्यात शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत, सत्ताधा-यांनी निवडणुकीत दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पाळले नाही. त्यामुळे अगोदरच संकटात असलेला शेतकरी पूर्णपणे हताश आणि निराश झालेला आहे.




अशा परिस्थितीत सर्वांनी शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहण्याची गरज आहे. बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन करून या प्रश्नांना वाचा फोडलेली आहे. युवक काँग्रेस व काँग्रेस पक्षही सातत्याने शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन सरकारला जाब विचारत आहे. शेतकरी कर्जमाफी, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी तसेच शेतमालाला योग्य हमी भाव मिळावा, या मागण्यासांठी काँग्रेस पक्षाकडून आंदोलने सुरु आहेत. जगाचा पोशिंदा बळीराजाच अडचणीत आहे. शेतकरी जगला तर महाराष्ट्र आणि देश जगेल, त्यामुळे शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी युवक काँग्रेस व काँग्रेस पक्ष सरकारविरोधातील संघर्ष चालूच ठेवणार असून आगामी काळात तो आणखी तीव्र करेल अशे प्रतिपादन युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.

# जिल्ह्यातील कामगारांना गृहउपयोगी साहित्य न देता शासना कडून बोगस बिले घेणाऱ्या मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड संस्थेवर कारवाई करा- नगरसेवक अमर शेख

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील नोंदीत कामगारांना साहित्य न देता साहित्याची रक्कम मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड संस्थेची व संबधित अधिकारी यांची चौकशी करून कारवाई कराणे बाबत महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांनी जिल्हाधिकारी बीड. मा मंत्री आ.धनंजय मुंडे यांना निवेदना द्वारे केले .**

निवेदनात अमर शेख यांनी म्हटले.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ अंतर्गत राज्यातील नोंदीत कामगाराकरिता गृह उपयोगी साहित्य वितरण करण्या साठी. मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनी संस्थेची निवड करण्यात अली राज्य संह बीड जिल्ह्यात मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड कामगारांचे ऑनलाइन अर्ज प्रोसेस करून घेतले पण बीड जिल्ह्यातील ४० टक्के लोकांना साहित्य मिळालेले नसून बीड जिल्ह्यातील अनेक कामगार मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड संस्था कार्यालय नामलगाव तालुका बीड येथे हेलपाटा मारतात संस्थेतील कर्मचारी काहीच उत्तर देत नसून उलट तुमचे वस्तू तुम्हाला देण्यात आल्याचे सांगतात अनेक कामगारांना कसले ही वस्तू न भेटता त्यांचा नावे वस्तू संच उचल्याच सांगण्यात येत आहे सदरील प्रकरणात मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड.संस्था व कामगार विभाग संबंधित कर्मचाऱ्याची मिली भगत असून सर्व प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्यात यावी नसता लोकशाही मार्गाने कामगारांच्या हिता साठी महाराष्ट्र बांधकाम संघटनेच्या वतीने लवकरच जिल्हा सरकारी कामगार कार्यालय समोर उपोषनांस बसवण्यात येईल असा इशारा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक यांनी दिला.



# उच्चशिक्षितांचेही लक्ष आता कारंजा टॉवरकडे!

## येथे साजऱ्या होणाऱ्या वाढदिवसांनी या ऐतिहासिक वास्तूची दुरावस्था दूर होणार का – एस.एम.युसूफ़

बीड । प्रतिनिधी

शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर कडे आता उच्चशिक्षितांचेही लक्ष जाऊ लागले आहे. नुकतेच येथे एका अभियंत्याचा वाढदिवस येथे साजरा करण्यात आला. येथे साजऱ्या होणाऱ्या वाढदिवसांनी या ऐतिहासिक वास्तूची दुरावस्था दूर होणार का असा प्रश्न या निमित्ताने मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.

सन २०१४ सालापासून ऐतिहासिक कारंजा टॉवर ची दुर्दशा दूर करण्यात यावी याकरिता शासन-प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. याकरिता वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली आहेत. प्रसिद्धी माध्यमातून लेख आणि बातम्या



सुद्धा प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. तरीही जिल्हा प्रशासन असो की बीड नगर परिषद प्रशासन दोघांकडूनही ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी गेल्या अकरा वर्षात एकही काम करण्यात आलेले नाही. या ऐतिहासिक इमारतीच्या परिपूर्णतेसाठी आवश्यक असलेली १४ कामे करण्याची यादी जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकारी यांना देण्यात आलेली आहे. त्यापैकी ०३ कामे कारंजा परिसरातील मिर्झा अब्दुल रऊफ़ बेग यांनी पुढाकार घेत इतरांना सोबत घेऊन केली आहेत. बाकीची ११ कामे अजूनही प्रतीक्षेतच आहेत. म्हणून वेळोवेळी याकडे दोन्ही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे. तरीही जिल्हा ▶▶ पान २ वर...

# डीवायएफआयच्या तालुका अध्यक्षपदी जगन्नाथ पाटोळे तर सचिवपदी सचिन टिळक यांची निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

डेमोक्रेटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय) या युवक संघटनेचे तालुका अधिवेशन१३जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनास शहर व तालुक्यातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. या अधिवेशनात डीवायएफआयची नवीन तालुका कमिटी निवडली गेली. या नवीन तालुका कमिटीमध्ये डीवायएफआयच्या अध्यक्षपदी जगन्नाथ पाटोळे तर सचिवपदी सचिन टिळक यांची एकमताने निवड करण्यात आली. या





अधिवेशनात नवीन १४ सदस्यांची तालुका कमिटी एकमताने निवड करण्यात आली. ही नवीन कमिटी डीवायएफआयचे जिल्हा उपाध्यक्ष सुहास चंदनशिव यांनी मांडली. व त्याला सर्व सदस्यांनी मान्यता दिली. देविदास जाधव यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. सहसचिव म्हणून प्रशांत मस्के, आकाश कसबे तर कोषाध्यक्ष वैभव राजमाने यांची निवड करण्यात आली. आकाश सासणे, अनिल फुले, काझी साहब, राहुल भावठाणकर,बबलू सर्वदे, नरेश चव्हाण,रामदास घाडगे यांची ▶▶ पान २ वर...

# चोभानिमगाव येथे वादळी वाऱ्यासह पावसाने डाळिंब बागेचे मोठं नुकसान

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील चोभा निमगाव येथे वादळी वाऱ्या सह जोरदार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे डाळिंब बागेचे नुकसान झाले. चोभा निमगाव येथील शेतकरी रामलाल किसन थेटे या शेतकऱ्याने कर्ज उसनवारी करून चार वर्षांपूर्वी सहाशे डाळिंबाची झाडांची बाग फुलवली होती. परंतु या वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने सहाशे झाडा पैकी किमान दोनशे झाड पडले आहेत,या वर्षी त्यांनी अडीच तीन लाख रुपये खर्च करून झाड संगोपन केली होती ,चार वर्षापासून ते या झाडांना खर्च संगोपन करत आहेत. काल परवा झालेल्या पाऊसाने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. लवकरात लवकर शेतकऱ्यांची या नुकसानीचे पंचनामे करून दखल घेऊन शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्यावा. फळ बागेचे जितक्या प्रमाणात नुकसान झाले तितक्याच प्रमाणात मदत मिळावी. नुकसान लाखात मदत हजारात असे करू नका अशी मागणी येथील शेतकरी करत आहेत.

# बच्चु भाऊ कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा म्हणून महालक्ष्मी चौकात अन्नत्याग आंदोलन करणार -श्री गायके राजू

## शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

बीड । प्रतिनिधी

माजी आमदार श्री बच्चुभाऊ कडू यांच्या मोझरी येथे चालू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा जाहीर पाठिंबा असून या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री राजू शेट्टी साहेब यांनी चक्काजाम आंदोलन पुकारलेल्या बच्चुभाऊ कडू यांच्या प्रमुख मागण्या संदर्भात.१) महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्याची



संपूर्ण कर्जमुक्ती झालीच पाहिजे.२) दिव्यांग व्यक्तींना शंभर टक्के मदत मिळाली पाहिजे.३) एम एस पी च्या धरतीवर २० % अनुदान राज्य शासनाने शेतकऱ्यांना तात्काळ द्यावा.४) २०२० पासून थकीत पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ वर्ग करण्यात यावा.५) रिटायरमेंट कर्मचाऱ्यांना पुन्हा नोकरीवर घेऊ नये अशा या विविध शेतकऱ्यांच्या मागण्यांच्या निषेधार्थ या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटना व शेतकरी हिताचे नेते आणि इतर संघटनाच्या वतीने महालक्ष्मी चौकात चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी महालक्ष्मी चौक, रामनगर , नामलगाव फाटा बीड येथे ठीक सकाळी ११:०० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष ▶▶ पान २ वर...

# अभाविपच्या मागणीला यश !

## बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना अभाविप च्या प्रयत्नांनी विद्यावेतन लागू !

**बीड । प्रतिनिधी**

**अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतरवासी (इंटर्नशिप) कालावधीदरम्यान विद्यावेतन मंजूर करण्यात आले आहे. हा निर्णय राज्यातील हजारो नर्सिंग विद्यार्थ्यांसाठी अत्यंत दिलासादायक ठरणार आहे.**

शासकीय बी.एस.सी. नर्सिंग अभ्यासक्रमांतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या इंटर्नशिप दरम्यान सकाळ, दुपार व रात्र अशा तीनही सत्रांमध्ये सेवा बजवावी लागते. आपत्कालीन परिस्थितीतही हे विद्यार्थी रुग्णसेवेचे कर्तव्य पार पाडतात परंतु या कालावधीत त्यांना कोणतेही मानधन किंवा विद्यावेतन मिळत नव्हते. या अन्यायकारक परिस्थितीच्या विरोधात अभाविपने आवाज उठवत प्रशासनाला अनेक वेळा निवेदन सादर करून बी.एस.सी. नर्सिंग विद्यार्थ्यांना दरमहा सात हजार रुपये विद्यावेतन देण्याची मागणी केली होती. राज्यातील गोरगरीब व शेतकरी कुटुंबांतील विद्यार्थी या कोर्समध्ये प्रवेश घेत असतात यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

शासनाने या निवेदनाची दखल घेत विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेतला असून अभाविपच्या या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. अभाविप या निर्णयाचे स्वागत करत असून या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या अनेक समस्यांचे निराकरण होणार असून त्यांचे मनोबल उंचावन्यास मदत होईल तसेच त्यांच्या शिक्षणाच्या वाटचालीत सकारात्मक बदल घडून येईल.

अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री कु.वैभवी ढिवरे म्हणाल्या की मागील अनेक दिवसांपासून बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन लागू व्हावे यासाठी अभाविप प्रयत्न करत होती. या प्रयत्नांना यश आले असून बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना या निर्णयामुळे दिलासा मिळणार आहे. अश्या अनेक समस्या विद्यार्थ्यांना येतात व त्या सोडवण्यासाठी अभाविप नेहमीच विद्यार्थ्यांसोबत असेल.(सदर प्रसिद्धी पत्रक प्रदेश कार्यालय मंत्री अजय सपकाळ यांनी छत्रपती संभाजीनगर येथून प्रसिद्धीस दिले आहे.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्याचे विद्यमान मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून दि.०६ जून रोजी सकाळी १०:०० वाजता शिवराज्याभिषेक दिन या कार्यक्रमाचे व्हिडोओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाईन उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपूर्ण महाराष्ट्रातील ४१९ शासकीय आय.टी.आय.मध्ये करण्यात आले.तर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माजलगाव या संस्थेत देखील यावेळी शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून आ.प्रकाश सोळंके हे उपस्थित



होते.मान्यवरांच्या हस्ते छ.शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सोळंके यांनी ३५० वर्षापूर्वी शिवराज्याभिषेक दिन साजरा झाला होता, त्यावेळची परिस्थिती आणि आजची ▶▶ पान २ वर...